आरोपी न्यायबंदी

दि.१८/०३/२०२६.    प्रकरण क्रं.  :— १५०७/पीडब्ल्यू/२०२५

साक्षीदार क्रं.:—१    निशाणी क्रं.  :— ८ पुढे चालू.

शपथेवर पुढिल सरतपास सरकारी अभियोक्ता श्री प्रसाद प्रदिप जोशी यांच्या मार्फत

४०. माझा मोबाईल मी पोलीसांना तपासणीसाठी दिलेला आहे. तो पाहिल्यास मी ओळखू शकतो. (सरकारी अभियोक्ता श्री प्रसाद प्रदिप जोशी यांनी अशी विनंती केली की, साक्षीदाराचा मोबाईल हा फॉरेन्सिक तपासणीकरीता पाठवण्यासाठी पोलीस ठाण्यामध्ये आहे, त्यामुळे सदर मोबाईल साक्षीदारास दाखवण्याची मुभा ठेवून सरतपास संपवण्याची परवांनगी दयावी).

४१. सदर मोबाईल यथावकाश साक्षीदारास दाखविता येईल आणि ही बाब सरतपासामध्ये देखील पुराव्यामध्ये घेता येईल त्यामुळे सरतपास संपला.

उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री अरोरायांच्यामार्फत

४२. आरोपी हे न्यायबंदी असून त्यांनी व्हिडीओ कॉन्फेरेसिंगवरून विनंती केली की, त्यांच्या वकिलांना त्यांनी प्रकरण चालवणेबाबत सुचना दिल्या आहेत.

४३. आरोपीचे वकिल वारंवार पुकारता गैरहजर. आरोपी न्यायबंदी असल्यामुळे त्यांना उलट तपासणीची संधी देणे गरजेचे आहे त्यामुळे उलट तपास पुढिल तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष 18/3/26

(अ. भा. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
७१ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.
दि.१८/०३/२०२६.

दि.१८/०३/२०२६.
सराद.